## Let’s Skill Maharashtra

# औरंगाबाद जिल्हा
# कौशल्य विकास आराखडा
# सन २०१७-१८




जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
मालजीपुरा, स्टेशन रोड, औरंगाबाद
संकेतस्थळ:- www.rojgar.mahaswyam.in / https://www.mssds.in

ई-मेल : asstdiremp.awb@ese.maharashtra.gov.in /aurangabadrojgar@gmail.com
☎ व फॅक्स (०२४०) २३३४८५९

# प्रस्तावना

सन २०२२ पर्यंत भारताची ६४% टक्के लोकसंख्या १५ ते ५९ या कार्यप्रवण (Working Age Group) वयोगटातील असेल. तसेच, भारतातील लोकांचे सरासरी वयोमान २९ वर्षे असेल. म्हणजेच २०२२ पर्यंत भारत हा जागातील सर्वात तरुण देशांपैकी एक असेल व उत्पादनक्षमता असलेले बहुसंख्य मनुष्यबळ भारताकडे असेल. वाढती बाजारपेठ, कमी किंमतीत उत्पादनाचे ठिकाण आणि कुशल मनुष्यबळाचे स्त्रोत असलेल्या भारतात विदेशी गुंतवणूक मोठया प्रमाणात वाढत आहे. परिणामी, स्थानिक, राष्ट्रीय, जागतिक पातळीवर विविध क्षेत्रात मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. या संधींच्या माध्यमातून आपल्या अर्थव्यवस्थेत शाश्वत वृध्दी व विकास होण्यासाठी प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ असणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर विविध उद्योग व इतर क्षेत्रांतील संधीचा फायदा घेण्यासाठी भारतातील तरुण वयोगटातील उमेदवारांना अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानानुरुप कौशल्याधारित प्रशिक्षणाव्दारे उत्पादनक्षम बनविण्याच्या दृष्टीने **"कौशल्य विकास"** या कार्यक्रमास राष्ट्रीय प्राधान्य मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रासाठी ४.५० कोटी कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

सन २०१४ पासून मा.पंतप्रधान यांच्या "मेक इन इंडिया" या संकल्पनेस अनुसरुन **"स्कील इंडिया"** या नावाने कौशल्य विकास कार्यक्रमास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर **"कौशल्य विकास व उद्योजकता"** या स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केली आहे. या अनुषंगाने तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या मेक इन महाराष्ट्र या ध्येयास अनुसरुन राज्यात कौशल्य विकास अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी दिनांक १५.०१.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पूर्वीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे रुपांतर करुन "कौशल्य विकास व उद्योजकता विभाग" या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

औरंगाबाद जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील व इतर रोजगार इच्छुक उमेदवारांचे कौशल्य विकास प्रशिक्षणातुन सक्षमीकरण करुन त्यांचे जीवन रोजगारक्षम बनविणे सोईचे होईल. सदरील आराखडा हा यासाठी पथदर्शी ठरले यात शंका नाही.

**(डॉ. निधी पांडे)** भा.प्र.से
जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष.
जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती
औरंगाबाद

# औरंगाबाद जिल्हा दृष्टीक्षेपात

## पार्श्वभूमी :-

औरंगाबाद आज जेथे वसलेले आहे त्या खाम नदीच्या तीरावर याच जागी खडकी नांवाचे प्राचीन गाव वसलेले होते. काही इतिहासकारांच्या मते १६०४ मध्ये अहमदनगरचा निजामशहा मुर्तझा द्वितीय याचा मंत्री मलिक अंबर याने हे शहर वसवले असा दावा केला जातो. परंतु हे गाव अस्तित्वात होते फक्त त्याचे नामकरण केल्या गेले. मलिक अंबरने या शहाराचे नांव फतेहपुर असे ठवले. १६३४ मध्ये औरंगजब या शहरात दख्खन विभागाचा सुभेदार म्हणुन आला. १६४४ मध्ये तो आग्र्याला परत गेला. क्ष्यानंतर १६८१ मध्ये औरंगजब मुगल बादशहा असतांना पुन्हा या शहारात आला. १७०७ मध्ये त्याच्या मृत्युपर्यंत औरंगजब येथेच राहिला. औरंगाबाद शहराजवळ असणा-या खुलताबाद या छोटयाशा गावात औरंगजबाची कबर आहे. १७०७ नंतर औरंगाबादचा ताबा पुढे हैद्राबादच्या निजाम राजवटीचा भाग म्हणुन राहिले. इ.स. १८८९ मध्ये औरंगाबादेत पहिली कापुस प्रक्रिया गिरणी उभी राहिली. त्यात ७०० जणांना रोजगार मिळाला. निझाम राज्यात हैद्राबाद-गोदावरी व्हॅली रेल्वेची सुरवात झाल्यानंतर इ.स. १९०० सुमारास शहर आणि परिसरात अने जिनींग कारखाने सुरु झाले.

## १) जिल्हयाचे स्थान व प्राकृतिक रचना :-

औरंगाबाद जिल्हा १९.५३’४७” उत्तर अक्षांश आणि ७५.२३’५४” पूर्व रेखांशमध्ये वसला आहे. शहर चारही बाजुनी टेकडया आणि डोंगररांगानी वेढलेले आहे.
औरंगाबाद जिल्ह्याच्या पूर्व बाजूस जालना जिल्हा, पश्चिमेस नाशिक जिल्हा, दक्षिणेस बीड व अहमदनगर जिल्हा व उत्तरेस जळगाव नाशिक जिल्हा आहे. औरंगाबाद जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०१०७ चौरस किलोमीटर असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ४% आहे. जिल्ह्याच्या जमानीचे उंच सखलपणामुळे घाटमाथा, मावळ आणि पठार असे तीन स्वाभाविक विभाग पडतात. औरंगाबाद, कन्नड, खुलताबाद, गंगापुर, वैजापुर, पैठण, फुलंब्री, सिल्लोड व सोयगाव हे तालुके आहेत. या जिल्हयात चार उपविभाग आहे. त्यात प्रथम औरंगाबाद, वैजापुर, पैठण-फुलंब्री व सिल्लोड असे ०४ उपविभाग आहे. जिल्हयाचा सर्वसाधारण उतर दक्षिण व पुर्वेकडे आहे. जिल्हयाचे उत्तर भागात अजिंठा पर्वताच्या पायथ्याचा अरुंद पट्टा आहे.

**खनिज** :- इमारतीला लागणाऱ्या मजबूत काळया दगडाच्या खाणी या जिल्ह्यात आहेत. याशिवाय गारेचे दगड, रंगासाठी लागणारी लोणारी व गेरुची लाल माती जिल्ह्यात सापडते. जिह्याच्या पुर्व भागात चूनखडी सापडते.

**नद्या** :- औरंगाबाद शहर खांब नदीवर वसलेले आहे.गोदावरी नदी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. ती नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे उगम पावते. नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातून वाहत जाऊन वैजापुर ताल्युक्यात प्रवेश करते.गोदावरी नदी वैजापुर,गंगापुर,पैठण या तालुक्यातील बहुतांश करुन सिमेवरुन वाहते. पुर्णा,शिवना,खांब,दुधना,गल्हाटी,गिरिजा अशा उपनद्या आहेत. गोदावरीच्या बहुतांश नद्या कन्नड तालुक्यातील डोंगररांगातुन उगम पावतात.जिल्ह्यातील बहुतांश नद्या हंगामी स्वरुपाच्या आहेत.ज्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात.अजिंठा लेणी वाघुर नदीकाठी वसलेली आहे.

**हवामान व पर्जन्यमान** :- औरंगाबाद जिल्ह्याचे हवामान हे सर्वसाधारपणे विषमस्वरुपाचे आहे.हवामानाच्या दृष्टिने वर्षाचे तीन भाग पडतात.जुन ते सप्टेंबर हवा साधारण उष्ण असले तरी पावसामुळे हवामान थंड तर मध्य भागात ते कोरडे असल्याचे आढळते, पूर्वेकडील इंदापूर, बारामती व दौंड तालुक्यात हवा उष्ण व कोरडी असते. जिल्ह्यात बहुतांशी पाऊस नैऋत्य मौसमी वाऱ्यापासून पडतो, काही तालूक्यात ईशान्य मान्सून वाऱ्यापासूनही पाऊस पडतो. जिल्ह्यात पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण कमी कमी होत जाते. पश्चिमेस १००० मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस पडतो. तर अतिपूर्व भागात सुमारे ६०० ते ७०० मिलिमीटर पाऊस पडतो.

**शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळे** :- जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, मराठा शिक्षण संस्था, मौलाना आझाद शिक्षण संस्था, सरस्वती शिक्षण संस्था, पिपल्स एज्युकेशन सोसायटी इत्यादी संस्थामध्युन कला, वाणिज्य, शास्त्र, वैद्यकीय, अभियांत्रिकी व संगणक शाखेत केवळ याच राज्यातील नव्हे तर देशातील तसेच परदेशातील विद्यार्थीही शिक्षण घेत आहेत. याशिवाय सी-डॅक, भरतीपुर्व प्रशिक्षण संस्था, सिपेट, महात्मा गांधी मिशन, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय इत्यादी संस्थाही औरंगाबाद शहरात संशोधनाचे व विद्यादानाचे कार्य आहेत.

जिल्ह्यामध्ये पर्यटकांना आकर्षित करणारी अनेक ठिकाणे आहेत. त्यापैकी अजिंठा लेणी व वेरुळ लेणी ही जगप्रसिध्द अशी पर्यटन स्थळे आहेत. देवगिरी (दौलताबाद) ऐतिहासिक महत्व असलेले किल्ला औरंगाबाद शहराजवळ १० किलोमिटर अंतरावर आहे. धार्मिकदृष्टया महत्व असलेले पैठण हे जुने शहर जगप्रसिध्द आहे. येथे ज्ञानेश्वराचे समाधी मंदिर असुन. पैठण नगरी ही संताची भुमी म्हणुन प्रसिध्द आहे. बारा ज्योतिर्लिगापैकी वेरुळ येथे ज्योतिलिंग मंदिर आहे. खुलताबाद येथे औरंजगाबाची कबर व जागृत हनुमानाचे मंदिर आहे. जगप्रसिध्द अंजिठा व वेरुळ लेणी पाहण्यासाठी जगभरात पर्यटक येथे भेटी देत असतात. औरंगाबाद शहरात एकुण ५२ जुने दरवाजे असुन ५२ दरवाजाचे शहर म्हणुनही प्रसिध्द आहे. औरंगाबाद येथे ताज महलाची प्रतिकृत असलेला बेबीका मकबरा, पवनचक्की अशी पर्यटन स्थळे औरंगाबाद जिल्हयात आहे.

## २) लोकसंख्या- जनगणना २०११ अंतिम आकडेवारी :-

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ३७,०१,२८२ असून यामध्ये १९,२४,४६९ पुरुष व १७,७६,८१३ स्त्रिया आहेत. जिल्ह्यातील २००१-२०११ या दशकातील दशवार्षिक लोकसंख्या वाढीचे प्रमाण ३५.३७ आहे. जिल्ह्याची लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटर मागे ७१६ माणसे एवढी आहे. नागरी भागात ती ९८२२ व ग्रामीण भागात ती ३१६ आढळते. लोकसंख्या घनतेनुसार औरंगाबाद जिल्ह्याचा राज्यात सातवा क्रमांक येतो. जिल्ह्यातील दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९२३ आहे. राज्याचे दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९२९ असून ग्रामीन व शहरी भागात ते अनुक्रमे ९५२ व ९०३ इतके आहे.

## ३) उद्योग :-

१९४८ च्या फॅक्टरी ॲक्ट या कायद्यानुसार डिसेंबर २०१५ अखेर २४२९ कारखाने नोंदलेले होते. त्यापैकी १९८३ चालु होते. या कारखान्यामध्ये ३०७३२८ कामगार काम करित होते. जिल्ह्यात शेतीची अवजारे, नांगर, पंप व इंजिने कापड गिरण्या औषधे रबरी व प्लॅस्टीकच्या वस्तू साबण, नायलॉन, बिस्किटे, वीजेचे सामान, भांडी लाकडाची खेळणी असे अनेक छोटे मोठे कारखाने आहेत. औरंगाबाद शहराच्या पश्चिमेला जुना कागदी कारखना आहेत. तसेच औरंगाबाद शहरात औरंगाबाद टेक्सटाईल व देवगिरी टेक्सलाईल अशा मोठया कापड बनविणा-या मिल होत्या. त्यापैकी देवगिरी मिल बंद असुन औरंगाबाद टेक्सटाईल मिल चालु आहे. स्वयंचलित वाहने आणि वाहनांचे सुटे भाग, बिअर आण व्हीस्की, चामडे, औषधनिर्मिती, रबर, बी-बीयाणे आणि किटकनाशके ही औरंगाबादेतील प्रमुख उत्पादने आहेत. निर्लेप, लुपिन लॅबोरेटरी, ग्रिव्हज कॉटन लिमिटेड, गरवारे पॉलीस्टर, औरंगाबाद सिल्क मिल्स केविल सोल्युशन इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचे प्रकल्प आहेत. शिवाय अनेक भारतीय आणि परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या आणि उद्योग समुहाचे प्रकल्प औरंगाबादेत आहेत. वानगीदाखल त्यापैकी काहीची नांवे अशी औरंगाबाद शहराला छोटी मुंबई सुध्दा बोलल्या जाते. औरंगाबाद शहराची मेट्रोसिटीकडे जोरदार वाटचाल सुरु आहे.

| अ.क्र. | उद्योगाचा प्रकार | उद्योगाची संख्या | कार्यरत मनुष्यबळ |
|---|---|---|---|
| १ | मोठे (Large) | ७२ | ३३६०२ |
| २ | माध्यम(Meadium) | १४२ | ४९९१२ |
| ३ | लघु(Small) | १८१८ | ५९०८९ |
| ४ | सूक्ष(Micro) | ११३४६ | ८३२६० |
| | एकूण | १३४६२ | २२५८६३ |

**स्त्रोत :- MSME MUMBAI REPORT**

# जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती

१.१ शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(३/२०१०)/व्यशि-५,दि.२१ मे २०११ नुसार जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती गठित करणे. तसेच शासन निर्णय क्र. कौविउ-२०१५/प्र.क्र.१४२/रोस्वरो-१ दि.१२ ऑगस्ट २०१५ नुसार जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची पुर्नरचना करणेबाबत सदरचा शासन निर्णय निर्गमित झाल्याने मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती गठित करणेत आली आहे.

## जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची रचना

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | सदस्य |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद | सदस्य |
| ४. जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ५. जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी | सदस्य |
| ६. प्रचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था (जिल्हास्तरीय) | सदस्य |
| ७. जिल्हा कृषी अधिकारी | सदस्य |
| ८. जिल्हा पशुसंवर्धन, | सदस्य |
| ९. जिल्हा मत्स्यसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| १०. जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ११. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य |
| १२. प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| १३. जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| १४. महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| १५. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक जिल्हा विकास प्रकल्प आदिवासी विभाग | सदस्य |
| १६. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | सदस्य |
| १७. प्रतिनिधी Confederation of Indian Industry (CII) | सदस्य |
| १८. जिल्हयातील किमान दोन प्रख्यात स्वयंसेवा संस्थांचे प्रतिनिधी (जिल्हयाधिकारी नामनिर्देशित करतील). | सदस्य |
| १९. जिल्हयामधील तीन औद्योगिक संघटनाचे प्रतिनिधी (उद्योग संघटना,बिल्डर असोसिएशन इ.), | सदस्य जिल्हयाधिकारी नामनिर्देशित करतील. |
| २०. सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केन्द्र. | सदस्य सचिव |

## ४. जिल्हयाचा इतर तपशील :-

| अ.क्र. | जिल्हयाची माहिती | संख्या | तपशील |
|---|---|---|---|
| १ | तालुके | ०८ | सिल्लोड, सोयगाव, फुलंब्री, औरंगाबाद, कन्नड, वैजापुर, गंगापुर व पैठण |
| २ | महानगरपालिका | ०१ | औरंगाबाद महानगर पालिका |
| ३ | नगरपालिका | ०३ | सिल्लोड, कन्नड, वैजापुर, |
| ४ | नगर परिषद | ०५ | फुलंब्री, सोयगाव, गंगापुर, पैठण, खुलताबाद |
| ५ | कटकमंडळे | ०२ | औरंगाबाद, पैठण |
| ६ | ग्राम पंचायत | ८५८ | |
| ७ | पंचायत समित्या | ९ | औरगाबाद, पैठण, गंगापुर, वैजापुर, कन्नड, खुलताबाद, फुलंब्री, सिल्लोड, सोयगाव |
| ८ | आदिवासीक्षेत्र/ क्षेत्रग्राम पंचायत | ४ | सिल्लोड, कन्नड |
| ९ | पर्यटन स्थळे | ९ | अजिंठा लेणी, वेरुळ लेणी, औरंगाबाद गुफा, पितळखोरा लेणी, गौताळा औट्रमघाट अभयारण्य, म्हैसमाळ, दौलताबाद किल्ला (देवगिरी), खुलताबाद, बीबी का मकबरा, पाणचक्की, ज्ञानेश्वर उद्यान, पैठण, सिध्दार्थ उद्यान व प्राणिसंग्रहालय, ५२ दरवाजे, हिमरु शाल कारखाना, सलीम अली तलाव व पक्षी अभयारण्य, जायकवाडी धरण, जायकवाडी पक्षी अभयारण्य इत्यादी |
| १० | औदयोगिक क्षेत्र | ०४ | वाळुज, वैजापुर, पैठण, चिकलठाण, रैल्वे स्टेशन, औरंगाबाद, सिल्लोड, शेंद्रा पंच तारांकित औद्योगिक वसाहत. बिडकीन येथे नविन कॉरीडॉल पंचताराकिंत औद्योगिक वसाहतीचे काम सुरु. |
| ११ | कृषी उत्पन्न बाजार समिती | ०७ | सिल्लोड, कन्नड, वैजापुर, फुलंब्री, गंगापुर, औरंगाबाद, पैठण |
| १२ | प्रमुख पिके | -- | मका, ज्वारी, कापुस,भुईमुग,,गहु, उस, डांबीळ, मौसबी इ. |
| १३ | धरणे | -- | जायकवाडी (नाथ सागर) शिवना नदीवरील गडदगड धरण इ. |

स्त्रोत :- अर्थ व सांख्यिकी संचालनालय प्रकाशित जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१४

## ४.२ जिल्हयाची प्रशासकीय रचना :-

| अ.क्र. | उपविभाग | त्यात समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद शहर | औरंगाबाद शहर व औरंगाबाद ग्रामीण |
| २ | पैठण-फुलंब्री | फुलंब्री, पैठण |
| ३ | वैजापुर | वैजापुर, गंगापुर, खुलताबाद |
| ४ | सिल्लोड | सिल्लोड, कन्नड, सोयगांव |

## ४.३ जिल्हयाची सांख्यिकी माहिती :-

### जनगणना २०११ नुसार तालुकानिहाय लोकसंख्या खालील प्रमाणे आहे.



| अ.क्र | तालुक्याचे नांव | ग्रामीण | शहरी | पुरुष | स्त्रिया | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | २८१२६८ | १३०९१०६ | ८२८९७१ | ७६१४०३ | १५९०३७४ |
| २ | सिल्लोड | ३०१७३३ | ५८२३० | १८७०२३ | १७२९४० | ३५९९६३ |
| ३ | फुलंब्री | १६१०१२ | ० | ८३५९१ | ७७४२१ | १६१०१२ |
| ४ | सोयगांव | ११३०८७ | ० | ५८८९६ | ५४१९१ | ११३०८७ |
| ५ | कन्नड | ३००२६० | ४०७५९ | १७७६४० | १६३३७९ | ३४१०१९ |
| ६ | खुलताबाद | १०२५७९ | १५७४९ | ६१२२५ | ५७१०३ | ११८३२८ |
| ७ | वैजापुर | २७००७५ | ४१२९६ | १६०८२६ | १५०५४५ | ३११३७१ |
| ८ | गंगापुर | २५६१६८ | १०१९८७ | १८६५५७ | १७१५९८ | ३५८१५५ |
| ९ | पैठण | २९४९३० | ५३०४३ | १७९७४० | १६८२३३ | ३४७९७३ |
| | **एकुण** | **२०८१११२** | **१६२०१७०** | **१९२४४६९** | **१७७६८१३** | **३७०१२८२** |

**स्त्रोत :-** www.censusindia.gov.in

## ४.५ शिक्षण व प्रशिक्षण संस्था (शासकीय व खाजगी.)

| अ.क्र | शाळा/महाविदयालयाचा प्रकार | संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | शाळा | ३०२५ | ५६८६४७ |
| २ | महाविदयालय(१२वी,एम.सी.व्ही.सी.,बी.ए.,बी.एस.सी.,बी.कॉम.) | ६६ | ४७३५० |
| | **एकूण** | **३०९१** | **५६८६४७** |
| ३ | तंत्र माध्यमिक शाळा | १२ | |
| ४ | औ.प्र.संस्था | १६ | |
| ५ | पॉलीटेक्निक | १५ | |
| ६ | अभियांत्रिकी महाविदयालय | १२ | |
| ७ | इतर(उदा.मेडिकल,कृषी,हॉटेल व्यवस्थापन,एम.बी.ए.इत्यादी.) | ४ | |
| | **एकूण** | **५९** | |

**स्त्रोत -** सन २०१२ चा NSDC रिपोर्ट.

## ४.६ महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाचे क्षेत्र/सहकारी वसाहती :-

| अ.क्र | तालुका | महाराष्ट्र औदयोगिक विकास महाराष्ट्र मंडळ/सहकारी वसाहीतीची संख्या | महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या क्षेत्रातील सुरु असलेल्याउद्योग घटकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | चिकलठाणा, रेल्वे स्टेशन, वाळुज, शेंद्रा | १३१८ |
| २ | वैजापुर | औद्योगिक वसाहत वैजापुर | ४० |
| ३ | गंगापुर | औद्योगिक वसाहत गंगापुर, वाळुजगाव | १४६ |
| ४ | कन्नड | औद्योगिक वसाहत कन्नड | २७ |
| ५ | सिल्लोड | औद्योगिक वसाहत सिल्लोड | २४ |
| ६ | पैठण | औद्योगिक वसाहत पैठण | ११२ |

**स्त्रोत -** MSME मुंबई रिपोर्ट

## ४.७ तालुकानिहाय प्रमुख औदयोगिक क्षेत्रे

| अ.क्र. | तालुका | प्रमुख औदयोगिक क्षेत्र | प्रमुख उदयोग |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | चिकलठाणा | आय.टी.पार्क |
| | | रेल्वे स्टेशन एमआयडीसी | रसायने उदयोग, फॅब्रिकेशनअ |
| | | वाळुज | वाहन उदयोग, मद्य उद्योग |
| | | चितेगांव पैठण रोड | इलेक्ट्रॉनिक्स,वाहन उदयोग संबंधित |
| | | चित्तेपिंपळगाव, बीड रोड | इलेक्ट्रॉनिक्सवाहन/उदयोग संबंधित |
| | | शेंद्रा पंचताराकिंत वसाहत | वाहन उद्योग. फॅब्रिकेशन |
| २ | पैठण | चितेगांव, पैठण रोड | इलेक्ट्रॉनिक्स उद्योग, अन्न प्रक्रिया वेअर हाऊस |
| | | पैठण एमआयडीसी | फ्लोरिकल्चर, अन्न प्रक्रिया वेअर हाऊस |
| ३ | वैजापुर | एमआयडीसी एरिया वैजापुर | रसायने उदयोग टेक्सटाईल्स |
| ४ | गंगापुर | औद्योगिक वसाहन, गंगापुर, वाळुज परिसर | वाहन उदयोग/ केमिकल उद्योग, वेअर हाऊस |
| ५ | कन्नड | औद्योगिक वसाहत कन्नडु | साखर उद्योग, रसायने उद्योग |
| ६ | सिल्लोड | औद्योगिक वसाहत सिल्लोड | साखर उद्योग, वेअर हाऊस |

## २.३.३ महत्वाचे उदयोग/व्यवसाय:--



| अ.क्र | जिल्हयातील नामांकित उदयोग | ठिकाणे |
|---|---|---|
| १ | स्कोडा उद्योग, ओखार्ड लिमिटेड, | शेंद्रा पंचतारांकित वसाहत |
| २ | व्हिडीओकॉन लिमिटेड | चित्तेगांव, पैठण रोड |
| ३ | बजाज ऑटो लिमिटेड | वाळुज एमआयडीसी एरिया |

## २.३.४ जिल्हयातील मोठया उदयोजकांची नावे:-

| अ.क्र. | उदयोजकांचे नाव | उदयोग |
|---|---|---|
| १ | राहुल बजाज | बजाज ऑटो लिमिटेड |
| २ | खा. राजकुमार धुत | व्हिडीओकॉन लिमिटेड |
| ३ | स्कोडा लिमिटेड | स्कोडा लिमिटेड |

## ५.जिल्हयात भविष्यात येणारे उदयोग :-

| अ.क्र. | उदयोगाचे क्षेत्र/सेक्टर | उदयोगाचा प्रकार/नाव | मनुष्यबळास अपेक्षित प्रमुख कौशल्य (स्कील सेट) |
|---|---|---|---|
| १ | कृषि | कृषि | कौशल्य दर्जा नियंत्रण /गुणवत्ता मशीन ऑपरेटर संवाद/नेतृत्व कौशल्य / यंत्र देखभाल दुरुस्ती |
| २ | ॲटो ॲड ॲटोकंपाऊंड | ॲटो ॲड ॲटोकंपाऊंड | रिपेअर ॲन्ड ओवरहॉलिंग ऑफ २ व्हीलर,३ व्हीलर बॉडी रिपेअर डेंटींग ॲन्ड पेंटिंग बेसिक कार सर्व्हिसिंग |
| ३ | सेवा उद्योग | बॅकिंग, फायनास | इन्स्युरन्स सेल्स ॲडवाइजर इन्स्युरन्स सेल्स असोसिएटस इन्स्युरन्स सेल्स पर्सन |
| ४ | बांधकाम | बांधकाम | बार बेंडर प्लंबर मेसन क्रेन ऑपरेटर |
| ५ | शिक्षण व कौ.विकास | शिक्षण व कौ.विकास | स्पोकन इंग्लिश ॲन्ड कम्युनिकेशन स्किल ॲग्रो बेस प्रोडक्टस |
| ६ | अन्न प्रक्रिया | अन्न प्रक्रिया | ॲग्रो बेस प्रोडक्टस मिल्क ॲन्ड मिल्क प्रोडक्टस |
| ७ | हेल्त केअर | हेल्त केअर | बेडसाईड असिस्टंट मसाज टेक्निशियन. |
| ८ | आयटी | आयटी | डीटीपी ॲन्ड प्रिंट पब्लिशिग बीपीओ नॉन व्हॉइस |
| ९ | रिटेल | रिटेल | सेल्स पर्सन रिटेल ऑपरेशन |
| १० | टेक्सटाईल ॲड क्लोदिंग | टेक्सटाईल ॲड क्लोदिंग | स्पिड फ्रेम डोगर ॲन्ड क्लिनर ओपन एन्ड मशिन टेंटर |
| ११ | ट्रान्सपोर्ट | ट्रान्सपोर्ट | लोडर ड्राइव्हर कम कुरिअर. |
| १२ | ट्रॅव्हल टुरिझम ॲड हॉस्पिटॅलिटी | ट्रॅव्हल टुरिझम ॲड हॉस्पिटॅलिटी | टुर असिस्टंट गाईड ट्रॅव्हल एक्सेकेटिव्ह |
| १३ | असुधारित | असुधारित | सिक्युरिटी गार्ड डोमेस्टिक वर्कर |
| १४ | मॅन्युफॅक्चेरींग | मॅन्युफॅक्चेरींग | फिनीश गुडस किपर मटेरिअल हॅन्डलिंग |
| १५ | इतर | इतर | जेम्स ज्वेलरी इलेक्ट्रॉनिक्स |

## ५.१ जिल्हयात स्वयंरोजगार/व्यवसाय सुरु करण्यासारखे उदयोग:

| **अ.क्र.** | **स्वयंरोजगार/ व्यवसाय क्षेत्र/ सेक्टर** | **व्यवसायाचा प्रकार नाव** | **मनुष्यबळास अपेक्षित प्रमुख कौशल्य (स्किल सेट)** |
|---|---|---|---|
| १ | कृषि | कृषि, आधारित उद्योग, स्वयंरोजगार, कुटीर उद्योग | ●दर्जा नियंत्रण/गुणवत्ता कौशल्य<br>●ठिबक देखभाल दुरुस्ती<br>●संवाद/नेतृत्व कौशल्य<br>●यंत्र प्राथमिक देखभाल/दुरुस्ती<br>●पॅकेजिंग कौशल्य |
| २ | ॲटो ॲड ॲटोकंपाऊंड | ॲटो ॲड ॲटोकंपाऊंड आधारीत उद्योग | ●मोटर मेकॅनिक<br>●ॲटो मेकॅनिक<br>●ॲटो बॉडी रिपेअर डेन्टींग ॲड पेंटींग. |
| ३ | सेवा उद्योग | सेवा उद्योग | ●विमा विक्री सल्लागार<br>●विमा एजंट |
| ४ | बांधकाम | बांधकाम,बांधकाम क्षेत्रातील निगडीत व्यवसाय, स्वयंरोजगार | ●गवंडीकाम<br>●नळकारागीर<br>●विजतंत्री |
| ५ | शिक्षण व कौ.विकास | शिक्षण व कौ.विकास | ●सेवा उद्योगास पुरक माहिती विक्रेते. जाहिरातदार |
| ६ | अन्न प्रक्रिया | अन्न प्रक्रिया, फळ प्रक्रिया, भाजीपाला व कृषि उत्पादनावर संशोधन व प्रक्रीया उद्योगण | ●फळे व भाज्यावर प्रक्रिया उद्योग<br>●कृषि उत्पादनांवर आधारीत उद्योग<br>●फळांचे पॅकेज व त्यास लेबलिंग करणे<br>●अन्न प्रक्रिया उद्योगाच्या यंत्र सामुग्रीची देखभाल व दुरुस्ती. |
| ७ | हेल्थ केअर | हेल्थ केअर, व्यायाम शाळा, हेल्थ कल्ब इत्यादि | ●डाएट ॲन्ड वेलनेस काऊंसेलिंग.<br>●ऑप्टीशियन<br>●लॅबरॉटेरी<br>● योग शिक्षक<br>●आर्युवेद स्पा थेरपी क्लिनिक.. |
| **अ.क्र.** | **स्वयंरोजगार/ व्यवसाय क्षेत्र/ सेक्टर** | **व्यवसायाचा प्रकार नाव** | **मनुष्यबळास अपेक्षित प्रमुख कौशल्य (स्किल सेट)** |
| ८ | आयटी | आयटी | ●डिटीपी ॲन्ड प्रिंट पब्लिशिंग<br>●ॲनिमेशन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ●ॅप्रोग्रामर |
| ९ | रिटेल | रिटेल | ●जनरल स्टोअर्स<br>●होलसेल स्टोअर्स |
| १० | टेक्सटाईल ॲड क्लोदिंग | टेक्सटाईल ॲड क्लोदिंग | ●डाईंग ॲड ब्लिचींग शॉप. |
| ११ | ट्रान्सपोर्ट | ट्रान्सपोर्ट | ●कुरिअर<br>●मालवाहतुक व्यवसाय |
| १२ | ट्रॅव्हल टुरिझम ॲड हॉस्पिटॅलिटी | ट्रॅव्हल टुरिझम ॲड हॉस्पिटॅलिटी | ●ट्रॅव्हल एजंट<br>●टुर ऑर्गनाझर |
| १३ | असंघरित क्षेत्र | | ●ब्युटी पार्लर बिझनेस<br>●टेलरिंग |
| १४ | मॅन्युफॅक्चेरींग | मॅन्युफॅक्चेरींग | ●उद्योजकांना आवश्यक अवजारे पुरवठा व्यवसाय. |
| १५ | इतर | इतर | ●ज्वेलरी मेकींग<br>●हाऊस मेड वायरमॅन |

# ६.मनुष्यबळाची मागणी

## ६.१ सन २०२२ पर्यंत विविध क्षेत्रात वाढते मनुष्यबळ मागणी

| अ.क्र. | क्षेत्र | सन २०१२-२०१७ | सन २०१८-२०२२ | सन २०१२-२०२२ |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी व कृषीपूरक व्यवसाय | १८४८९ | ९४२२ | २७९११ |
| २ | ॲटो आणि ॲटो कंम्पोनंन्ट | २१२२० | ३२६७१ | ५८८९१ |
| ३ | बँकीग फायनांसियल सर्व्हीसेस ॲन्ड इन्शुरन्स | १४४७६ | २३२७० | ३७७४७ |
| ४ | कन्स्ट्रक्शन | ४०५७२ | ५६३०७ | ९६८८० |
| ५ | केमिकल ॲण्ड फार्म | ११३५ | ११९५ | २३२९ |
| ६ | शैक्षणिक व कौशल्याधारित क्षेत्र | ११४५९ | ६७६० | १८२१८ |
| ७ | अन्न प्रक्रिया(फूड प्रोसेसिंग) | १३३० | १७१६ | ३०४६ |
| ८ | हेल्थकेअर | ६६८५ | ९१४९ | १५८३५ |
| ९ | रिटेल | १६५०८ | ४१०७७ | ५७५८५ |
| १० | टेक्स्टाईल ॲन्ड क्लोथिंग | ८३९ | १०६४ | १९०३ |
| ११ | ट्रान्स्पोर्टेशन, लॉजिस्टिक, वेअरहाऊसिंग ॲन्ड पॅकेजिंग | ६५२८ | ७४०१ | १३९२९ |
| १२ | टूरिझम, ट्रॅव्हल्स, हॉस्पिटॅलिटी ॲन्ड ट्रेन्ड | १९९२५ | २९०१२ | ४८९३७ |
| १३ | इतर उत्पादनक्षेत्र(वेल्डर,फिटर) | १३७९३ | २२७०७ | ३६५०० |
| १४ | इतर जसे जेम्स ॲन्ड ज्वेलरी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी | ४९८ | ५७० | १०६८ |
| | **एकूण** | **१७३४५८** | **२४२३२१** | **४१५७७९** |

स्त्रोत - सन २०१२ चा NSDC रिपोर्ट

## ६.२ औरंगाबाद जिल्हयात मनुष्यबळ मागणी असलेले व सदयस्थितीत ज्या सेक्टरमध्ये प्रशिक्षण सुरु आहे याची माहिती



| अ.क्र. | जिल्हा | मनुष्यबळ मागणी असलेले क्षेत्र | प्रशिक्षण सूरु आहे अशी क्षेत्रे |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | • ॲग्रीकल्चर,<br>• ऑटोमोटीव्ह रिपेअर,<br>• ब्युटि कल्चर ॲन्ड हेअर ड्रेसिंग,<br>• बी.एस.एफ.आय.,कन्स्ट्रक्शन,<br>• फुड प्रोसेसिंग,<br>• गारमेंट मेकिंग,<br>• आय.सी.टी.,<br>• हेल्थ केअर,<br>• प्रोडक्शन ॲन्ड मॅन्युफॅक्चरिंग,<br>• रिटेल,<br>• टुरिझम,<br>• एज्युकेशन,<br>• ट्रान्सपोर्ट,<br>• अनऑरगनाइस्ड सेक्टर इत्यादी. | • ऑटोमोटीव्ह रिपेअर,<br>• ब्युटि कल्चर ॲन्ड हेअर ड्रेसिंग,<br>• बिसनेस ॲन्ड कॉमर्स, कन्स्ट्रक्शन,<br>• काऊंसेलिंग स्किल,<br>• इलेक्ट्रिकल,<br>• इलेक्ट्रॉनिक्स, फॅब्रिकेशन,<br>• फॅशन डिसाइन,<br>• गारमेंट मेकिंग,<br>• जेम ॲन्ड ज्वेलरी,<br>• हॉस्पिटॅलिटी,<br>• इनफॉरमेशन ॲन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी,<br>• मेडिकल ॲन्ड नर्सिंग,<br>• रेफ्रिजरेशन ॲन्ड एअर कंडिशनिंग,<br>• सॉफ्ट स्किल्स,<br>• एस.एस.सी.-ॲपरेल,<br>• एस.एस.सी.-ऑटोमोटीव्ह,<br>• एस.एस.सी.-इलेक्ट्रॉनिक्स,<br>• एस.एस.सी.-हेल्थ केअर,<br>• एस.एस.सी.-टेलिकॉम. |

**वरील माहितीसाठी सोबतचे परिशिष्ट १ व २ पहा**

## • ७.२ कौशल्याधारित जिल्हयाचा SWOT Analysis

•



| Strenth | Opportunities |
|---|---|
| १) शैक्षणिक संस्थांची उपलब्धता<br>२) दळणवळणाची उत्तम साधने (रेल्वे,बसेस,विमाने)<br>३) मोठे औद्योगिक क्षेत्र | १) टेक्स्टाईल<br>२) आय टी<br>३) हेल्थकेअर<br>४) ऑटोमोबाईल<br>५) कन्स्ट्रक्शन<br>६) रिटेल<br>७) ट्रान्स्पोर्ट |
| **Weekness** | **Threats** |
| १) कौशल्य विकास योजनेबाबत समाजामध्ये अपूरी माहिती<br>२) तालुकानिहाय प्रशिक्षण संख्यांची कमतरता<br>३) भौगोलिक क्षेत्रनिहाय आवश्यक प्रशिक्षण संसाधनाची कमी. | १) टेक्स्टाईल, हेल्थकेअर, कन्स्ट्रक्शन सारख्या सेक्टरमध्ये काम करणेसाठी तरुणांना तयार करणे. |

## ७.३ प्रशिक्षणाचे २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लक्ष्य व त्यासाठी आवश्यक निधी

- जिल्हयातील सेक्टरनिहाय मनुष्यबळ मागणी, सेक्टरनिहाय सूचीबध्द प्रशिक्षण संस्था, प्रशिक्षण सुरु असलेल्या तुकडयांची संख्या व प्रशिक्षण घेत असलेले उमेदवार इ.बाबतची माहिती **परिशिष्ट-१** मध्ये सोबत जोडली आहे.

- जिल्हयात शासनाच्या विविध विभागांतर्गत कौशल्य विकासाचे कार्य करण्यात येते. जिल्हयात एकंदरीत कौशल्य विकासाचे नेमके किती काम होते याचा आढावा घेण्यासाठी जिल्हयातील कौशल्य विकासाचे कार्य करणऱ्या शासनाच्या विभागाकडून प्राप्त माहिती **परिशिष्ट-२** मध्ये सोबत जोडली आहे.

- जिल्हयात शासनाच्या विभागाशिवाय खाजगी संस्थांमार्फत कौशल्य विकासाचे कार्य करण्यात येते. संपूर्ण जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हयातील कौशल्य विकासाचे कार्य करणाऱ्या नामांकीत खाजगी संस्थांकडून प्राप्त माहिती **परिशिष्ट-३** मध्ये सोबत जोडली आहे.

- मनुष्यबळ मागणीच्या तुलनेत सद्यस्थितीत क्षेत्रनिहाय सूचीबद्ध प्रशिक्षण संस्था, त्यांची प्रशिक्षण क्षमता, कौशल्य विकासाचे लक्ष साध्य करण्यासाठी भविष्यात आवश्यक प्रशिक्षण संस्थांची संख्या व कौशल्य विकास प्रशिक्षणाचे २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे लक्ष्य व त्यासाठी आवश्यक निधी इ. बाबतची माहिती **परिशिष्ट-४** मध्ये सोबत जोडली आहे.

- राज्यातील जिल्हयानिहाय कौशल्य विकास प्रशिक्षण लक्ष्य, साध्य, उपलब्ध व खर्च झालेला निधी याचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी या माहितीचे संकलन करणे आवश्यक आहे. त्यासाठीचा नमुना **परिशिष्ट-५** मध्ये सोबत जोडला आहे.

## ८. आराखड्यानुसार निश्चित केलेले उदिष्ट साध्य करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम संबंधित सर्व सहभाग धारकांनी खालीलप्रमाणे कार्यवाही विहित वेळी विहित मुदतीत करणे अपेक्षित आहे

**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र-**

- सदर आराखडा "जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीस" सादर करणे. समितीच्या मान्यतेने कौशल्य विकासाच्या योजना राबविणाऱ्या इतर विभागाचे लक्ष्य निश्चित करून सदर लक्ष्य साध्य करण्यासाठी आवश्यक निधी संबंधित विभागामार्फत मागणी करणे व २०१७-२०१८ या वर्षासाठी सदर विभागाकडे आवश्यक निधी उपलब्ध असल्याची खात्री करणे.
- सर्व जिल्ह्यानी "कौशल्य विकास आराखडा" तयार करून विभागीय मुख्यालयास सादर करणे.
- २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेने जिल्हासाठी राखीव ठेवलेल्या निधीच्या अनुषंगाने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान अंतर्गत प्रशिक्षणाचे सुधारित लक्ष्य निश्चित करणे.
- प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान अंतर्गत प्रशिक्षणासाठी व कौशल्य विकासाच्या योजना राबविणाऱ्या इतर विभागाकडील कौशल्य विकासाठी उपलब्ध निधीचा विचार करून २०१७-२०१८ या वर्षाचे लक्ष्य निश्चित करून "जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची" मान्यता घेणे.
- "जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती" मध्ये मंजूर अंतिम आराखड्याची अंमलबजावणी करणे.
- नवीन प्रशिक्षण संस्था सूचीबद्ध करण्यासाठी NSDC/SSC च्या वेबपोर्टलला वेळोवेळी भेट देऊन अथवा जिल्ह्यातील उपलब्ध नामांकित संस्था उदा. टॅली, कोहिनूर, जेटकिंग ई. प्रकारच्या संस्थेकडे सूचीबद्ध संस्थांची यादी डाउनलोड/प्राप्त करून त्यांचेशी संपर्क करून सदर संस्था म.रा.कौ.वि.संस्थेकडे सूचीबद्ध करण्याची कार्यवाही करणे.
- नवीन प्रशिक्षण संस्था नोंदणीसाठीचे आवश्यक नियोजन करणे व तपासणीची कार्यवाही प्राधान्याने करणे.
- उमेदवारास रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध होईल या अनुषंगाने प्रशिक्षित उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार मेळाव्यास आमंत्रित करून आवश्यक कार्यवाही करणे.
- उमेदवार जमवाजमव करण्यासाठी रोजगार मेळाव्यात प्रशिक्षण संस्थांना आमंत्रित करणे अथवा यासाठी स्वतंत्र मेळावे आयोजित करणे. सदर मेळाव्यात प्रशिक्षण संस्थांचे स्टॉल्स लावणे व सदर स्टॉल्सना भेट देऊन इच्छुकता दर्शविलेल्या उमेदवारांचा डाटा प्रशिक्षण संस्थांना देऊन प्रशिक्षण संस्थांचा पाठपुरावा करून तुकडी सुरु करणे.
- मेळावे आयोजित करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते/ अशासकीय/ स्वयंसेवी संस्था/ प्रशिक्षण संस्थांचे सहकार्य घेणे.

- जिल्ह्यातील शासकीय/ अशासकीय/ खाजगी प्रशिक्षण संस्थामार्फत करण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाची माहिती संकलित करणे.
- कौशल्य विकासाचे कार्य करणाऱ्या शासनाच्या विविध विभागास उमेदवार जमवाजमव करण्यासाठी मेळावे/ कार्यशळा आयोजनासाठी अथवा आवश्यक तेथे सहभागी होवून सहकार्य करणे.
- जिल्हयातील उद्योजकाकडून सी.एस.आर. (व्यवसाईक सामाजिक जबाबदारी) अंतर्गत कौशल्य विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध होवू शकेल काय याची चाचपणी करणे व निधी उपलब्ध होत असल्यास जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणून देणे.

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय मुख्यालय-

- त्यांचे विभागातील सर्व अधिनस्त जिल्ह्यांच्या आराखड्याचा एकत्रित सारांश तयार करुन जिल्हानिहाय आराखड्यासह कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयास सादर करणे.
- आराखड्यात नमूद उद्दिष्ट व साध्य याचा वेळोवेळी आढावा घेणे. तसेच, उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे मार्गदर्शन करणे.

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय

- विभागीय मुख्यालयाकडून प्राप्त सर्व जिल्ह्यांचे आराखडे एकत्रित करुन निश्चित केलेले उद्दिष्ट, आवश्यक निधी ई. माहितीचा सारांश तयार करुन महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेस सादर करणे.
- जिल्ह्यात कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी विहित मुदतीत होण्याकरिता अधिनस्त जिल्ह्यातील सर्व आवश्यक रिक्त पदे वेळोवेळी त्वरित भरण्याची कार्यवाही करुन आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे.
- जिल्ह्यात कौशल्य विकास कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेणे.

## महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था

- जिल्हानिहाय कौशल्य विकास आराखडा एकत्रित करून मान्यतेस्तव कौशल्य विकास व उद्योजकता विभागास सादर करणे.
